## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग भूम (न्यायालय क्र.२)

नि.फौज.खटला क्र.३६/२०१७
शासन वि. रुपेश चव्हाण
**निशानी क्र.४८**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.जे.जे.सरवदे यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | सुरेश दत्तूबा शिंदे |
| माझे वय सुमारे | :– | ६४ वर्षे |
| माझा व्यवसाय | :– | सेवानिवृत्त पी.एस.आय. |
| माझे राहण्याचे ठिकाण | :– | धाराशिव, ता. जि. धाराशिव |

**०१.** दिनांक २७.१०.२०१६ रोजी मी पोलीस स्टेशन भूम येथे पी.एस.आय. पदावर कार्यरत होतो. सदरच्या दिवशी पोलीस नाईक वैकुंठे यांनी गु.र.नं.१५७/२०१६ दाखल करुन त्याचा तपास माझ्याकडे देण्यात आला. त्यानंतर मी त्याच दिवशी घटनास्थळाला भेट दिली व दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. तेथे घटनास्थळावर संशयीत जुनी चप्पल जप्त केली. आता मला निशानी ३६ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. आता मला जप्त मुद्देमाल चप्पल दाखवली. ती तीच आहे. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येते. आता मला घटनास्थळाचे फोटो दाखवले. ते तेच आहेत. त्यास **आर्टीकल ब** देण्यात येते. त्यानंतर चार साक्षीदारांचे जबाब नोंदवले. गुन्हयाच्या तपासकामी श्वान पथकास पाचारण करण्यात आले होते. त्याप्रमाणे श्वान पथकामार्फत तपास करण्यात आला व तपास केलेले पत्र आम्हाला देण्यात आले. आता मला सदरचे पत्र दाखवले. ते तेच पत्र आहे. त्यावर श्वान पथक हाताळणाऱ्यांची सही आहे व माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी ४९** देण्यात येते.

त्यानंतर दिनांक ०७.०२.२०१७ रोजी आरोपीस अटक केले. त्यानंतर फिर्यादीचा मोबाईल जप्त करण्यात आला. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा तयार करण्यात आला. आता मला निशानी ३७ वरील जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. अर्जदारास न्यायालयीन आदेशाप्रमाणे मोबाईल परत करण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. साक्षीदाराचे पुरवणी जबाब नोंदवले. त्यानंतर आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप-पत्र दाखल केले. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी यांच्या निशानी ५० वरील उलटतपासाकरीता मुदतीच्या अर्जानुसार उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

MATE ASHLESHA SOUDAGAR

Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2025.08.19 17:33:23 +0530

दिनांक १८.०८.२०२५

**( श्रीमती अश्लेषा एस. मते )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भूम.
(न्यायालय क्र.२)